**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. १०/२०१४** **दि.१९.०५.२०१४**

| | |
|---|---|
| **श्री. सुनिल मधुसुदन जोशी**<br>**रुम नं. १,श्री. प्रभु निवास,**<br>**लाला लजपत राय मार्ग टिळकनगर**<br>**डोंबिंवली पुर्व.** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय खेड** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष**<br>**२) श्री. व्ही.बी.जगताप,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**३) श्री.ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) श्री. सुनिल मधुसुदन जोशी** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. एस.टि. नागठाणे**<br>**सहाय्यक अभियंता,**<br>**२) श्री. एस.एल. देशमुख**<br>**दुय्यम अभियंता** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनिमय २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री. सुनिल मधुसुदन जोशी, रुम नं. १, श्री. प्रभु निवास, लाला लजपत राय मार्ग टिळकनगर डोंबिवली पुर्व यांनी त्यांचे वागदरी, मौजे मोहाने, ता.खेड, जि.रत्नागिरी येथील सर्व्हे नं. ८९७ या शेत जमिनीमध्ये असलेल्या बोअरवेलवर वीज पंपाचे कनेक्शन न मिळालेबाबतची तक्रार फॉर्म/अ मध्ये मंचाकडे दि. १९.०५.२०१४ मध्ये दाखल केली आहे. तक्रार प्राप्त होताच कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय खेड यांचेकडे या मंचाकडून स्पष्टीकरण मागविणेत आले. त्यानुसार कार्यकारी अभियंता खेड यानी त्यांचे पत्र क्र. काअ/खेड/ तांत्रिक/२२५६ दि. १६.०६.२०१४ अन्वये आपले स्पष्टीकरण या मंचाकडे सादर केले. दरम्यान अधिनियमामधील तरतुदीनुसार उभय पक्षाना नोटीस काढण्यात येऊन दि. १७.०६.२०१४ रोजी सुनावणीची तारीख निश्चित करण्यात आली.

श्री. सुनिल मधुसुदन जोशी यांच्या तक्रारीचा तपशील असा आहे की, त्यानी त्यांच्या वर उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये शेतीपंपाचे कनेक्शन मिळणेसाठी उपविभागीय कार्यालय लोटे येथे दि.१८.०५.२०१३ रोजी अर्ज केला आहे, पण त्यांच्या अर्जावर महावितरणकडून कोणतीच दखल न घेतली गेल्यामुळे त्यानी दि.२३.०८.२०१३ रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज केला सदर अर्जानुसार कक्षाने दि.०५.१२.२०१३ रोजी निर्णय दिला पण या निर्णयाने त्यांचे समाधान झालेले नाही. त्यानंतर या पंपाचे कनेक्शन मंजूर झाले असून महावितरणकडून दि. ०७.०१.२०१४ रोजी कोटेशन देण्यात आले सदर कोटेशनप्रमाणे दि. ०८.०१.२०१४ रोजी त्यानी या कनेक्शनसाठी आवश्यक रक्कम महावितरणकडे जमा केली आहे. तसेच चाचणी अहवाल व इतर आवश्यक कागदपत्रे पण महावितरणकडे जमा केलेली आहेत.

हे कनेक्शन मंजूर होण्यापुर्वी या ग्राहकानी पंपासाठी तयार करावी लागणारी वीजवाहीनी स्वतःच तयार करण्याची योजना स्विकारलेली होती. त्याप्रमाणे त्यानी खाजगी कंत्राटदाराकडून आवश्यक वाहीनी तयार करुन घेतलेली आहे तसेच या वाहीनीची विद्युत निरिक्षक रत्नागिरी यांचेकडून दि.२३.०४.२०१४ रोजी तपासणी पण करुन घेतलेली आहेत पण महावितरणकडून त्यानंतरही कनेक्शन न देण्यात आल्यामुळे तसेच या संदर्भात कक्षाने दिलेल्या निर्णयामुळे समाधान न झालेमुळे त्यानी या मंचाकडे रितसर अर्ज दाखल केला आहे.

महावितरणकडून दाखल केलेल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद करण्यात आले आहे की, श्री. जोशी यानी दि.१८.०५.२०१३ रोजी त्यांच्या जमिनीमध्ये वीजपंपकनेक्शन साठी अर्ज केल्यानंतर अनुषंगिक कागदपत्रांची पुर्तता अर्जदारानी दि.०४.०१.२०१४ पर्यन्त केली आहे त्यानंतर त्याना दि.०७.०१.२०१४ रोजी कोटेशन देणेत आले व अर्जदारानी दि.०८.०१.२०१४ रोजी कनेक्शनच्या रक्कमेचा भरणा केलेला आहे.

अर्जदाराच्या सम्मती पत्राप्रमाणे विज वाहीनीचे सर्व काम अर्जदारानीच करावयाचे होते तसेच मिटरव्यतिरिक्त सर्व साहित्य अर्जदारानीच दयावयाचे होते. त्यानुसार हया वाहीनीचे काम अर्जदारानी खाजगी कंत्राटदाराकडुन पुर्ण करुन घेऊन विद्युत निरिक्षक यांचेकडून तसा अहवाल दि.३०.०४.२०१४ रोजी या कार्यालयाकडे सादर केला आहे.

दरम्यानच्या काळात अर्जदारानी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज केला होता कक्षानी देखील अर्जदाराकडून सर्व कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर नियमाप्रमाणे कनेक्शन देण्याबाबतचा निर्णय दिला आहे. पण प्रस्तुत प्रकरणा मध्ये अर्जदाराकडून कागदपत्रांची पुर्तता झालेनंतर लागलीच या प्रकरणास मंजुरी देण्यात आलेली आहे तसेच अर्जदाराकडून वाहीनीचे काम दि. ३०.०४.२०१४ रोजी पुर्ण झालेनंतर लागलीच कनेक्शनची रिलीज ऑर्डर काढणेत आलेली आहे. कनेक्शनचे मीटर व्यतिरिक्त लागणारे सर्व साहित्य ग्राहकानी आणावयाचे होते, पण सर्व्हिस वायर व इतर साहित्य ग्राहकानी आजतागायत उपलब्ध करुन दिलेले नाही त्यामुळे महावितरणला हे वीज कनेक्शन जोडता आलेले नाही. या बाबतीमध्ये महावितरणकडून कोणताही विलंब झालेला नाही.

सदर प्रकरणाची सुनावणी नियोजित दिवशी घेण्यात आली सुनावणीच्या वेळी स्वतः तक्रारदार व महावितरणकडून श्री एस्.व्ही. नागठाणे सहाय्यक अभियंता यानी हजर राहून आपला युक्तीवाद सादर केला.

सुनावणी दरम्यान श्री. जोशी यानी आपले लेखी निवेदन सादर केले. लेखी निवेदनानुसार त्यांचेकडून वाहीनीचे काम पुर्ण झाले असून कनेक्शन ताबडतोब देण्याबाबत विनंती करण्यात आली तसेच, महावितरणकडून श्री. नागठाणे यानी देखील हे कनेक्शन देण्याबाबत काहीही अडचण नसून अर्जदाराच्या कंत्राटदारानी कनेक्शन चे सर्व साहित्य उपलब्ध करुन दिल्यास कनेक्शन देण्यात येईल असे सांगितले.

सुनावणीच्या दरम्यानच मंचाच्या असे लक्षात आले की कनेक्शनच्या बाबतीत कोणतीही अडचण नसुन या मध्ये फक्त दोन्ही पक्षामध्ये संपर्क व समन्वय नसल्यामुळे कनेक्शनला विलंब होत आहे. त्यामुळे मंचाने उभय पक्षाना योग्य तो समन्वय साधून वीज कनेक्शन जोडून घेण्याची सुचना केली, तसेच या मध्ये काही अडचण उदभवल्यास दि.२४.०६.२०१४ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे सांगून सुनावणीची प्रक्रिया पुर्ण केली.

सदर सुचनेस अनुसरुन तक्रारदारानी सर्व साहित्य दि.१९.०६.२०१४ रोजी उपलब्ध करुन दिले तसेच महावितरणने देखील दि.२०.०६.२०१४ मध्ये हे वीज कनेक्शन जोडून दिलेले आहे. तसेच वीज कनेक्शनचे काम पुर्ण झाल्यानंतर ग्राहकानी देखील त्यांचे दि.२०.०६.२०१४ च्या पत्रानुसार कळविले असून आपल्या तक्रारीचे समाधान झाल्यामुळे आभार मानून दि.२४.०६.२०१४ रोजी आयोजीत केलेल्या सुनावणीस हजर रहाणार नसल्याचे कळविले आहे. सबब ग्राहकाच्या तक्रारीचे निरसन झालेले असल्यामुळे मंचाकडून हे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**१) अर्जदारानी सादर केलेल्या पत्राप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील विजपंपाच्या कनेक्शनबाबतची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

२) खर्च व अनुषंगिक बाबी करीता कोणताही आदेश नाही.

३) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

पत्ता :-सचिव,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,
६०६/६०८, केशवा,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.
फोन नं. ०२२- २६५९२९६५

| डी. एस्. जामखेडकर | श्री. व्ही.बी.जगताप | श्री ज. पु.बिवलकर |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव / कार्यकारी अभियंता | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- ०८.०७.२०१४
ठिकाण :- रत्नागिरी.